# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 20.01.2025** **वार- सोमवार**

---

**<u>मिसाळ</u>**

नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी आज पुणे मेट्रोच्या कामांचा आढावा घेतला. पुण्यातील सार्वजनिक वाहतूक सक्षम करण्याला राज्य सरकारचं प्राधान्य आहे, असं मिसाळ यांनी या बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत सांगितलं. पुणे मेट्रोच्या स्वारगेट स्थानकातून कात्रजपर्यंतच्या साडेपाच किलोमीटर अंतरावरील मार्केटयार्ड, पदमावती आणि कात्रज या तीन मेट्रो स्थानकाच्या प्रस्तावित भूमिगत मार्गाला केंद्र सरकारने हिरवा कंदील दिला आहे. त्यामुळे या मार्गावरील निविदा प्रक्रिया सुरू झाल्यानंतर काम सुरू होईल, त्याचबरोबर या मार्गावर प्रवासी मागणीनुसार पाच स्थानकं उभरण्याबाबत व्यवहार्यता तपासावी अशी सूचना प्रशासनाला केली असल्याचं मिसाळ यांनी सांगितलं.

**<u>महिलाआयोग</u>**

मेळघाटमध्ये एका महिलेला मारहाण करून तिची धिंड काढल्या प्रकरणी 5 आरोपींना अटक करण्यात आली असल्याची माहिती राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणाकर यांनी दिली आहे. त्या आज पुण्यात पत्रकार परिषदेत बोलत होत्या. या प्रकरणी समिती स्थापन करून सविस्तर अहवाल आठवडाभरात आयोगाला सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत, असं चाकणकर म्हणाल्या.

**<u>ग्रामविकास</u>**

केंद्राची प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजना आणि राज्य सरकारच्या ग्रामीण घरकुल योजनेच्या माध्यमातून पुणे विभागात २० लाख लाभार्थ्यांना घरकुलं उपलब्ध करून देण्याचं उद्दिष्ट आहे. यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयानं काम करावं, आणि ही घरकुलं शंभर दिवसात पूर्ण करून लाभार्थ्यांना हस्तांतरित करावीत असे निर्देश ग्राम विकास आणि पंचायत राज विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले यांनी दिले आहेत. महाआवास अभियानासंदर्भात पुण्यात झालेल्या विभागीय कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्यासह अन्य वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

**<u>साखर</u>**

पुणे विभागात सहकारी आणि खासगी, अशा ३१ साखर कारखान्यांमध्ये पूर्ण क्षमतेनं ऊस गाळप सुरू आहे. विभागात आतापर्यंत १ कोटी १४ लाख ९२ हजार टन उसाचं गाळप पूर्ण झालं आहे. पुणे विभागात १ कोटी २ लाख ३ हजार क्विंटल साखरेचं उत्पादन झालं आहे. राज्यात सर्वाधिक १० पूर्णांक ३९ टक्के साखर उतारा कोल्हापूर विभागात आहे, अशी माहिती पुणे साखर आयुक्तालयानं दिली आहे.

**<u>रोटरी</u>**

रोटरी क्लबच्या वतीनं पुण्यात काल झालेल्या 'दिव्यांग रोजगार मेळाव्याला' उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. रोटरी क्लब पुणे साऊथ आणि तळेगाव दाभाडे चॅलेंजर्स यांच्या सहयोगाने याचं आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी रोटरीचे गव्हर्नर शीतल शहा यांच्या हस्ते दिव्यांग व्यक्तींना उपयुक्त उपकरणांचं वाटप करण्यात आलं. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गौरी गाडगीळ, अजित कुंटे, अमोल करचे, परशुराम माळी आणि गीतांजली ढोबे यांचा यावेळी रोटरी इन्स्पायरिंग दिव्यांग आयकॉन म्हणून सत्कार करण्यात आला. या मेळाव्यात सुमारे ७०० दिव्यांग व्यक्ती आणि २५ कंपन्या सहभागी झाल्या होत्या.

**<u>रक्तदानशिबीर</u>**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविलद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून साखळी पध्दतीने रक्तदान शिबीर घेण्यात येणार आहे. हडपसरच्या अण्णासाहेब मगर महाविद्यालयातून आज त्याची सुरूवात झाली. न-हे इथल्या एशियन महाविद्यालयात तीन जून रोजी या शिबीराचा समारोप होणार आहे. विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉक्टर सदानंद भोसले यांनी आज ही माहिती दिली.

**<u>पुणेमनपा</u>**

पुणे महापालिकेच्या वतीने सुसज्ज आपत्ती व्यवस्थापन कक्ष उभारला जाणार आहे. साडेसात हजार चौरस फूट जागेत हा कक्ष असेल. यासाठी २ कोटी रुपयांच्या खर्चाला मान्यता देण्यात आली आहे. मुंबई महापालिकेच्या धर्तीवर येत्या चार महिन्यांत या कक्षाचं काम पूर्ण करण्याचं नियोजन आहे. दरम्यान क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत राडारोडा आढळला तर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याचा निर्णय पुणे महापालिका प्रशासनाने घेतला आहे. १५ क्षेत्रीय कार्यालयांतील अधिकारी कर्मचाऱ्यांवर यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी दिली आहे.

**<u>पुष्पप्रदर्शन</u>**

पुण्यातील एम्प्रेस बोटॅनिकल गार्डनमध्ये होणाऱ्या वार्षिक पुष्प प्रदर्शनाची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. येत्या 24 ते 27 जानेवारी या कालावधीत हे प्रदर्शन होणार आहे. यामध्ये गुलाब, झेंडू, जरबेरा, शेवंतीच्या विविध जातीसह काही दुर्मिळ फुलंही पाहायला मिळणार आहेत. तसंच फुलांच्या सजावटीच्या वस्तू, बोन्साय आणि निवडुंगाच्या प्रजातीही असतील.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज १२ पूर्णांक ५ दशांश अंश सेल्सियस किमान तापमानची नोंद झाली. उद्या हवामान कोरडं असेल आणि किमान तापमान १३ तर कमाल ३१ अंशांच्या आसपास राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**